। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ५३ वा । गुरूवार दिनांक ३० एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## नागरिकांना वेळेत सेवा देणे हीच प्रशासनाची खरी जबाबदारी प्रत्येक तालुक्यात आदर्श सेतू केंद्र उभारणार; सेवा हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचे प्रतिपादन

धाराशिव (जिमाका)- शासनाच्या विविध विभागांकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा वेळेत,पारदर्शकपणे आणि प्रभावीपणे मिळाल्या पाहिजेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची काटेकोर अंमलबजावणी करून नागरिकांचा वेळ आणि पैशांची बचत होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप सिंगुलवार, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी श्रीमती.अरुणा गायकवाड तसेच उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, सेवा हमी कायद्याचा दरमहा आढावा घेतला जात असून नागरिकांना वेळेत सेवा मिळणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगली सेवा देण्यात आली असून आता प्रत्येक तालुक्यात आदर्श सेतू केंद्र उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे.या केंद्रांमध्ये नागरिकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी,शक्यतो एका दिवसात उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.तसेच भविष्यात दिव्यांग व्यक्ती आणि अनाथांना सेतू केंद्र चालविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत विविध सेवा नागरिकांपर्यंत वेगाने आणि पारदर्शकपणे पोहोचल्या पाहिजेत. नागरिकांना छोट्या-छोट्या कामांसाठी कार्यालयात वारंवार येण्याची वेळ येऊ नये.तक्रारींचे ऑनलाईन निवारण प्रभावीपणे झाले पाहिजे.दूरवरून येणाऱ्या नागरिकांना समाधानकारक सेवा मिळाली नाही,तर प्रशासनाच्या कार्याला अर्थ उरत नाही,असे त्या म्हणाल्या.




कार्यक्रमाच्या प्रारंभी उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे यांनी उपस्थितांना सेवा हक्क दिनाची शपथ दिली.महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल धाराशिवचे उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी जिल्ह्यातील महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत कामगिरीचे सादरीकरणही करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी - कर्मचारी तसेच आपले सेवा केंद्र चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन आणि आभार तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांनी मानले.

## NEET-UG 2026 परीक्षेसाठी धाराशिवमध्ये कडक सुरक्षा परीक्षा केंद्रांभोवती १०० मीटर परिसरात कलम १६३ लागू

धाराशिव (जिमाका)- राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET-UG 2026) दि.३ मे २०२६ रोजी दुपारी २ ते ५ (दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दुपारी २ ते सायंकाळी ६) या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली असून परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत.परीक्षेची पारदर्शकता, शांतता आणि सुरळीतता अबाधित राखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील पाच परीक्षा केंद्रांवर एकूण १,९०२ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. यात शासकीय तंत्रनिकेतन,तुळजापूर रोड, धाराशिव येथे २४०,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव येथे २२२, जिल्हा परिषद कन्या प्रशाला,शहर पोलीस स्टेशनसमोर धाराशिव येथे २४०,श्रीपतराव भोसले हायस्कूल,तांबरी विभाग,धाराशिव येथे ७२० आणि रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, आकाशवाणीजवळ,बार्शी रोड,धाराशिव येथे ४८० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

अपर जिल्हादंडाधिकारी,धाराशिव यांनी जारी केलेल्या आदेशानुसार परीक्षा केंद्रांच्या परिसरात बाह्य उपद्रव रोखण्यासाठी आणि परीक्षार्थींना कोणताही अडथळा होऊ नये यासाठी विविध निर्बंध लागू राहणार आहेत. परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर,पानपट्टी,टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ,कॉम्प्युटर सेंटर,इंटरनेट कॅफे आदी सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत.

तसेच मोबाईल फोन,सेल्युलर फोन, फॅक्स,ईमेल,कॅलक्युलेटर किंवा इतर कोणतीही प्रसार माध्यमे परीक्षा केंद्र परिसरात नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.कोणत्याही प्रकारच्या घोषणा, गोंधळ, शांततेस बाधा पोहोचविणारे कृत्य,तसेच परीक्षा प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या हालचालींवर बंदी असेल.

परीक्षा केंद्र परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली असून परीक्षेशी संबंध नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस,अगदी परीक्षार्थ्यांच्या नातेवाईकांनाही प्रवेश दिला जाणार नाही.केवळ परीक्षा केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचारी,संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि परीक्षार्थी यांनाच प्रवेश असेल.

याशिवाय परीक्षा केंद्रांवर कोणत्याही वाहनांच्या प्रवेशावरही निर्बंध असतील. हे आदेश ३ मे २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ या कालावधीत लागू राहणार आहेत.प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत गुन्हा नोंदवून फौजदारी कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील परीक्षा प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शकतेने पार पडावी यासाठी सर्व संबंधितांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## २४ मेपर्यंत ई-पीक पाहणी अनिवार्य; जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रशासनाचे आवाहन

धाराशिव (जिमाका)- उन्हाळी हंगाम २०२५-२०२६ साठी राज्य शासनाच्या कृषी,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या निर्णयानुसार संपूर्ण राज्यात ८ एप्रिल २०२६ पासून ई-पीक पाहणी (Digital Crop Survey ADCS) मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची अचूक नोंद वेळेत करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

उन्हाळी हंगामासाठी शेतकरी स्तरावरील पीक नोंदणीचा कालावधी ८ एप्रिल २०२६ ते २४ मे २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे, तर सहायक स्तरावरील कालावधी २५ मे २०२६ ते ८ जुलै २०२६ राहणार आहे.

ई-पीक पाहणीद्वारे पीक नोंदणी केल्यास शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची अचूक आणि अद्ययावत माहिती शासनाकडे उपलब्ध होते.या माहितीद्वारे विविध शासकीय योजना,पीक विमा,नैसर्गिक आपत्तीतील नुकसान भरपाई तसेच इतर कृषीविषयक लाभ मिळविणे अधिक सुलभ होते.त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील उभ्या पिकांची,कायम पड किंवा चालू पड असलेल्या जमिनींची माहिती मोबाईल ॲपच्या माध्यमातून निर्धारित कालावधीत नोंदविणे अत्यावश्यक आहे.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी २४ मे २०२६ पर्यंत ई-पीक पाहणी ॲपद्वारे पीक नोंदणी पूर्ण करणे आवश्यक असून जिल्ह्यात १०० टक्के पीक नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या या डिजिटल उपक्रमामुळे कृषी व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार असून शासनाच्या योजनांचा लाभ अधिक पारदर्शक आणि वेगवान पद्धतीने मिळण्यास मदत होणार आहे.त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून पीक नोंदणी वेळेत पूर्ण करावी,असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

## जनगणना-२०२७ : १ मे ते १५ मेदरम्यान स्व-गणना मोहीम: जिल्ह्यात १०० टक्के सहभागासाठी प्रशासन सज्ज

**धाराशिव (जिमाका ) जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यात घर सूचीकरण (House Listing) प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार असून नागरिकांसाठी स्व-गणना (Self Enumeration) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.शासनाच्या निर्देशानुसार ही सुविधा १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत se.census.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.या उपक्रमामुळे नागरिकांना स्वतःची माहिती सुरक्षित, सुलभ आणि सोप्या ऑनलाइन पद्धतीने नोंदविता येणार आहे.**

मुख्य प्रधान जनगणना अधिकारी तथा जनगणना संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या निर्देशानुसार जनगणना-२०२७ संदर्भातील कामकाजाला प्रारंभ झाला असून जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक करण्यात आले आहे. पोर्टल इंग्रजी, हिंदीसह विविध प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध असल्याने अधिकाधिक नागरिकांना याचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

जिल्हा प्रशासनाने सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांची १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत अनिवार्यपणे १०० टक्के स्व-गणना पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच अधिनस्त कार्यालये,संस्था व क्षेत्रीय यंत्रणांनीही तत्काळ लेखी सूचना देऊन ही प्रक्रिया १०० टक्के पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शहरी व ग्रामीण भागातील सर्व नागरिकांमध्ये स्व-गणनेबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी प्रत्येक विभागाने मार्गदर्शक सूचनांचे पालन करत प्रभावी प्रचार मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या नाव व पदनामासह किमान एका मिनिटाचा व्हिडिओ संदेश तयार करून प्रसारित करावा,तसेच त्याची प्रत जिल्हा जनगणना कक्षाकडे पाठवावी, असे निर्देश आहेत.

याशिवाय बॅनर्स,सूचना फलक,डिजिटल माध्यमे,व्हिडिओ संदेश,ध्वनी संदेश,बैठका आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून स्व-गणना मोहिमेची व्यापक प्रसिद्धी करण्यावर भर देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने वेळोवेळी आढावा घेऊन कार्यवाही अहवाल सादर करण्याचे आदेशही सर्व संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जनगणना-२०२७ हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्राधान्याचा उपक्रम असून या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई किंवा टाळाटाळ आढळल्यास संबंधित कार्यालय प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.

त्यामुळे जिल्ह्यातील सर्व विभागांनी काटेकोर नियोजनासह स्व-गणना मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सज्ज राहावे,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजारी यांनी केले आहे.

## धाराशिव जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या सहसचिवपदी (सर्वसाधारण) ॲड. संजय भोरे यांची बिनविरोध निवड

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-धाराशिव क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवणारे ड. संजय भोरे यांची जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या सहसचिव (सर्वसाधारण) पदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीने वकील वर्तुळात आनंदाचे वातावरण असून, समाजाच्या सर्वस्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



मनमिळावू व सर्वसमावेशक वृत्तीचा विचार करून वकील बांधवांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे.

आपल्या निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ड. भोरे म्हणाले की, जिल्ह्यातील वकील बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि विधिज्ञ मंडळाच्या बळकटीकरणासाठी मी कटिबद्ध राहीन. ज्येष्ठ वकीलांच्या मार्गदर्शनाखाली आणि तरुण सहकाऱ्यांच्या सोबतीने बार असोसिएशनचे कामकाज अधिक गतिमान करण्याचा माझा मानस आहे.

या निवडीबद्दल जिल्हा न्यायालयातील वरिष्ठ वकीलांसह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी ड. संजय भोरे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सतिष उर्फ लखन रा. नळदुर्ग जि. धाराशिव हे दि.२७.०४.२०२६ रोजी सु.आलियाबाद पुलावर जळकोट रोड अंदाजे ३८,००० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २०० सिलबंद बाटल्या मोटरसायकल सह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर विनोद रा. जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२८.०४.२०२६ रोजी आपल्या राहत्या पत्र्याचे शेडसमोर अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

तसेच आंनदनगर पोलीस ठाण अंतर्गत अखलाख रा.पोलीस लाईन समोर धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.२८.०४.२०२६ रोजी छत्रपती नगर धाराशिव येथे अंदाजे १,५०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर लताबाई रा.राजेश नगर पारधी पिडी ढोकी ह.मु. उपळा मा. ता. जि. धाराशिव हे दि.२८.०४.२०२६ रोजी उपळा मा. येथे अंदाजे ३,००० किंमतीची लिटर ३० गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

## क्राईम न्युज

### लग्नाचे अमिष दाखवून केला लैंगिक अत्याचार

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २० वर्षीय मुलगी दि.२९.११.२०२१ रोजी एका गावातील एका तरुणांनी लग्नाचे अमिष दाखवून तिस वेगवेगळ्या ठिकाणी घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. तुझ्या आई वडीलांना सांगीतल्यास तुझे छायाचित्र व्हायरल करतो अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२७.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.वि.सं.कलम-३७६(२)(ळ) सह ६४) (२) (एम), ६९, ३५१(२),(३), ३(५) सह ४(२), ८, १२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक; गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, साजीद वय ३६ वर्षे, रा. वाढवणा बु. ता. उदगीर जि. लातुर, आरुात फारुक कुरेशी, रा. अकलुज ता. माळशिरस जि. सोलापूर यांनी दि. २८.०४.२०२६ रोजी वारदवाडी ते भुम रोडवरील नायरा पेट्रोलपंप वांगी बु येथे आयशर एमएच २५ बी ९१९० मध्ये गोवंशीय जातीच्या १४ जर्शी गायी एकुण ४,२०,००० किंमतीचे वाहनासह ११,२०,००० किंमतीचे गोवंशीय जनावरे क्रुरपणे भरुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(ए), ११(१)(एफ), ११(१)(एच), ११(१)(आय) सह कलम ५(अ), ५(बी),९(ब), ११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम ४७, ५४, ५६ परिवहन नियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याची अंगठी व रोख रक्कम हिसकावुन घेतले

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आदित्य शाम शिंदे, वय २३ वर्षे, रा. एल.आय.सी. कॉलनी लातुर ता. जि. लातुर हे त्यांचे मित्रासोबत तुळजापूर ते लातुर रोडवरील आरणी पाटी जवळ आले असता तौशीफ बशीर बागवान, चेतन गजेंद्र आदटराव, अतिश बाळु लोहार, सर्व रा. करजखेडा ता. जि. धाराशिव यांनी फिर्यादी व त्यांचे मित्रांना आडवून लाथाबुक्यानी मारहाण करुन फिर्यादीचे हातातील दोन तोळ्याची सोन्याची अंगठी व १,०००बळजबरीने हिसकावून घेवून निघून गेले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आदीत्य शिंदे यांनी दि.२८.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(४),११५(२),३५२, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# धाराशिव नगरपरिषदेत कारभाराचा बोजवारा! कागदांवर विकास, प्रत्यक्षात नागरिकांचा संताप!

**धाराशिव ( रामेश्वर डोंगरे)–** धाराशिव शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असताना, त्या सोडवण्यासाठी जबाबदार असलेल्या नगरपरिषद प्रशासनाचा कारभार मात्र पूर्णपणे ढिसाळ आणि अपारदर्शक असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी फेरणाऱ्या या प्रकारामुळे शहरात संतापाची लाट उसळल्याच दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नगरपरिषदेत जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीत झालेल्या विविध विषय समिती, सर्वसाधारण सभा आणि अंदाजपत्रकीय बैठकींचे कामकाज पूर्ण झाले असले तरी त्या सभांचे इतिवृत्त अद्याप मंजूर करण्यात आलेले नाही. इतकेच नव्हे, तर ही महत्त्वाची कागदपत्रे नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही प्रशासनाने पार पाडलेली नाही. परिणामी, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेचा पूर्ण अभाव असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

नागरिकांना त्यांच्या हक्काची माहिती मिळावी, यासाठी कायद्याने स्पष्ट तरतुदी असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. यामुळे पारदर्शक कारभार या घोषणेचा फक्त दिखावा केला जातोय का? असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

या पार्श्वभूमीवर काही नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करत कडक भूमिका घेतली आहे. जोपर्यंत मागील सभांचे इतिवृत्त अधिकृतरित्या मंजूर होत नाहीत, तोपर्यंत नवीन सभा घेणे थांबवावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. तसेच, ही प्रक्रिया लोकशाही व्यवस्थेच्या विरोधात असून नागरिकांचा विश्वासघात करणारी असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, या गंभीर प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा फोन बंद असल्याचे समोर आले. जबाबदार अधिकाऱ्यांची ही भूमिका संशयास्पद मानली जात असून, प्रशासनातील उत्तरदायित्वावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असताना, नागरिकांना त्यांच्या समस्यांसाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. मात्र ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि असंतोष निर्माण झाला आहे.

**नागरिकांचा संतप्त सवाल:**

जर निर्णय घेतलेच असतील, तर ते लपवण्याची गरज काय? पारदर्शकता कुठे गेली?

धाराशिवमधील अनेक नागरिकांनी सांगितले की, आम्हाला फक्त आश्वासने नकोत, प्रत्यक्षात काम हवे. नगरपरिषद आमच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असेल, तर आम्ही आंदोलनाचा मार्ग स्वीकारू.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ नुसार, सभांचे इतिवृत्त वेळेत मंजूर करून नागरिकांसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. मात्र या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. जर प्रशासनाने लवकरात लवकर या प्रकरणात सुधारणा केली नाही, तर नागरिक आणि लोकप्रतिनिधी मोठ्या आंदोलनाच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. जिल्हाधिकारी स्तरावर या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

# माकणी–तेरणा पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी १ मेपासून उपोषणाचा इशारा

उमरगा (प्रतिनिधी)–कलदेव निंबाळा तसेच उमरगा–लोहारा तालुक्यातील १६ गावांसाठी राबविण्यात येत असलेली माकणी–तेरणा धरणावरील जलजीवन पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असूनही अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. ही योजना तातडीने सुरू करावी, या मागणीसाठी ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाध्यक्षा सुनिता देविदास पावशेरे यांनी १ मे महाराष्ट्र दिनापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

भूकंपानंतरच्या काळातील २२ खेडी पाणीपुरवठा योजनेची महावितरणकडे ७६ लाख रुपयांची वीज बिल थकबाकी असल्याचे कारण देत योजना सुरू करण्यात येत नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. ही थकबाकी शासनाने किंवा जिल्हा परिषदेने भरावी अथवा माफ करावी आणि योजना त्वरित सुरू करावी, अशी मागणी पावशेरे यांनी केली आहे. यापूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आमदार, जिल्हा परिषद पदाधिकारी, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, सीईओ तसेच जीवन प्राधिकरण अभियंता यांना निवेदने देऊन पाठपुरावा केला आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सध्या या गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई असून महिला, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे गावांमध्ये संतापाची भावना असून पाणीपुरवठा तातडीने सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडूनही होत आहे.

थकबाकीचा प्रश्न सोडवा उमरगा–लोहारा तालुक्यातील १६ गावांना माकणी–तेरणा धरणावर आधारित जलजीवन पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असूनही वीज बिल थकबाकीमुळे ती सुरू करण्यात आलेली नाही. ७६ लाख रुपयांच्या थकबाकीचा मुद्दा पुढे करत प्रशासनाने अडथळा निर्माण केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. योजनेचा लाभ न मिळाल्याने गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे.

त्यामुळे सुनिता पावशेरे यांनी १ मेपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला आहे. शासनाने थकबाकीचा प्रश्न सोडवून योजना तत्काळ सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# दिंडी मिरवणूक व कीर्तनांनी सप्ताहाची सांगता:काक्रंबा येथे अक्षय तृतीयेपासून धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

काक्रंबा(प्रतिनिधी)–तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा येथील मारुती मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता रविवारी (दि. २६) विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडली. ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखी दिंडी मिरवणुकीसह टाळ–मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा–तुकारामच् या जयघोषाने संपूर्ण गाव भक्तीमय झाले होते. दिंडी मिरवणूक, काल्याचे कीर्तन आणि महाप्रसाद वाटपाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.

काक्रंबा येथील हनुमान (मारुती) मंदिरात अक्षय तृतीयेपासून या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सुरू असलेल्या या सोहळ्याच्या समारोपदिनी पहाटे अभिषेक व महापूजा पार पडली. त्यानंतर सकाळी सात ते नऊ या वेळेत ज्ञानेश्वरी वाचन करून पसायदान घेण्यात आले.

यानंतर ज्ञानेश्वर माऊलींची पालखी टाळ–मृदंगाच्या गजरात व ज्ञानोबा–तुकारामच् या जयघोषात संपूर्ण गावातून मिरवण्यात आली. गावातील महिलांनी घरासमोर सडा–रांगोळी काढून पालखीचे स्वागत केले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी पालखी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. यामुळे गाव भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले.

महाप्रसाद व काल्याच्या कीर्तनाने सप्ताह सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गौतम सोनटके, बापूराव जाधव, ह.भ.प. श्रीहरी ढेरे, संतोष सोनटके, बालाजी कोळेकर, किरण शिंदे, संपत सोनटके, सदाशिव ढेकरे, धनाजी सोनटके, अमोल क्षीरसागर, प्रकाश झाडे, दादा सोलंकर, अर्जुन झाडे, हणमंत सरक, साईनाथ झाडे, बालाजी गुरव, समाधान हांडे, सचिन ठवरे, सुरेश बनसोडे आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमांनी भाविक मंत्रमुग्ध अक्षय तृतीयेपासून मंदिरात दररोज सकाळी ज्ञानेश्वरी वाचन, तर रात्री नामजप, हरिपाठ, भजन, कीर्तन, प्रवचन यांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पहाटे हरिजागर, काकडा आरती आणि नामस्मरण य

ामुळे संपूर्ण गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

# १ मे रोजीच्या जिल्हा नियोजन समिती बैठकीसाठी धाराशिवमध्ये वाहतूक व पार्किंगचे नियोजन

धाराशिव, (जिमाका ) दि.०१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्हा प्रशासनाने बैठकीस उपस्थित राहणाऱ्या मान्यवर,अधिकारी, पदाधिकारी व नागरिकांसाठी वाहतूक नियंत्रण आणि पार्किंग व्यवस्थेबाबत सविस्तर नियोजन जाहीर केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या या महत्त्वपूर्ण बैठकीदरम्यान विविध मान्यवरांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे.

बैठकीस उपस्थित राहणारे पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक व त्यांचा ताफा,जिल्हा परिषद अध्यक्ष,खासदार,आमदार, जिल्हाधिकारी,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी,पोलीस अधीक्षक,अपर पोलीस अधीक्षक, अपर जिल्हाधिकारी,निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हा नियोजन अधिकारी यांची वाहने जिल्हाधिकारी कार्यालयातील गेट क्रमांक ०१ मधून प्रवेश करून निश्चित करण्यात आलेल्या पार्किंग स्थळी उभी करण्यात येतील.

जिल्हा नियोजन समिती बैठकीस निमंत्रित सर्व पदाधिकाऱ्यांची वाहने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेट क्रमांक ०२ मधून प्रवेश करतील व नियोजित पार्किंग ठिकाणी उभी राहतील.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख तसेच जिल्ह्यातील इतर सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांची वाहने जिल्हा परिषद,धाराशिव येथील गेट क्रमांक ०१ मधून प्रवेश करून जिल्हा परिषद परिसरातील पार्किंग स्थळी पार्क करण्यात येतील.

बैठकीस उपस्थित राहणाऱ्या पत्रकार बांधव व नागरिकांसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय,धाराशिव येथील पार्किंग स्थळ निश्चित करण्यात आले असून त्यांनी आपली वाहने तेथेच पार्क करावीत,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व संबंधित मान्यवर,पदाधिकारी, अधिकारी,कर्मचारी,पत्रकार व नागरिकांना सूचित केले आहे की,जिल्हा नियोजन समिती बैठकीसंदर्भातील वाहतूक आणि पार्किंग व्यवस्था सुरळीत पार पडण्यासाठी प्रशासनाने आखून दिलेल्या सूचनांचे पालन करावे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आयोजित या बैठकीत शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था आणि नियोजनबद्ध पार्किंगमुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यास मदत होणार आहे.

# गटई कामगारांसाठी १०० टक्के अनुदानातून पत्र्याचे स्टॉल; ३० जूनपर्यंत अर्ज मागविले

धाराशिव (जिमाका) ऊन,वारा आणि पावसापासून संरक्षण मिळावे तसेच गटई कामगारांची आर्थिक उन्नती साधता यावी,यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात १०० टक्के शासकीय अनुदानातून गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबविण्यात येत आहे.सन २०२५–२६ या वर्षासाठी पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

अर्जासाठी आवश्यक पात्रता व कागदपत्रे : अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.अर्जदाराकडे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेला जातीचा दाखला असावा.

अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी ८० हजार रुपये व शहरी भागासाठी १ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे.यासाठी तहसीलदार यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक राहील.अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे.आधार कार्डची झेरॉक्स प्रत. रेशनकार्डची झेरॉक्स प्रत.ज्या जागेसाठी स्टॉल मागितला जात आहे ती जागा ग्रामपंचायत,नगरपालिका,छावणी क्षेत्र (कॅन्टोन्मेंट बोर्ड) किंवा महानगरपालिका यांच्याकडून अधिकृतरित्या भाडे,करार,खरेदी किंवा मोफत ताब्यात दिलेली असावी अथवा स्वमालकीची असावी.यासाठी संबंधित कागदपत्रांची साक्षांकित प्रत आवश्यक आहे. गटई पत्र्याचे स्टॉल एकाच व्यक्तीस दिले जाईल.दुबार वाटप होणार नाही.

अर्जाचा नमुना समाज कल्याण कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहे. अर्जाची अंतिम मुदत,३० जून २०२६ पर्यंत आहे.तरी इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत.गटई कामगारांना सुरक्षित व्यवसाय सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाची ही योजना महत्त्वपूर्ण आहे.

# पोलिसांनी केली २,८५ ,६०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)– धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२८ एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा–नियम भंग प्रकरणी एकुण २८५ कारवाया करुन २,८५ ,६०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध नवउद्योजकांना १५ टक्के अनुदान लाभ घेण्याचे समाज कल्याणचे आवाहन

धाराशिव (जिमाका)– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त केंद्र व राज्य शासनाकडून विविध सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या योजना राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत केंद्र शासनाने सन २०१५ मध्ये जाहीर केलेल्या 'स्टँडअप इंडिया' योजनेत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांसाठी विशेष आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील सवलतीस पात्र नवउद्योजकांना उद्योग उभारणीसाठी आर्थिक पाठबळ दिले जाते. अर्जदाराने प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या १० टक्के स्वहिस्स्याचा भरणा केल्यानंतर आणि बँकेमार्फत स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर झाल्यानंतर उर्वरित १५ टक्के 'फ्रंट एंड सबसिडी' राज्य शासनामार्फत देण्यात येते.

या योजनेचा लाभ स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे.इच्छुक लाभार्थ्यांनी आयुक्त,समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या नावे विहित नमुन्यातील मागणीपत्र सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे : उद्योग आधार नोंदणी पत्र,जात प्रमाणपत्र,बँकेचे कर्ज मंजुरी पत्र,बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्प अहवालाची प्रत,शासनाने नमूद केलेली इतर आवश्यक कागदपत्रे.या सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र नवउद्योजकांनी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, धाराशिव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांना उद्योगक्षेत्रात सक्षम करण्यासाठी आणि स्वावलंबनाची नवी संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# कायमस्वरूपी सेवेत घेण्याची मागणी; शिक्षकांचे उपोषण

**धाराशिव (शीला उंबरे–पेंढरकर)–** नगर परिषद धाराशिव येथील बालवाडी शिक्षिकांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यास प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत, २८ एप्रिल २०२६ बालवाडी शिक्षिका जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसल्या आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने आणि दिशाभूल करणारी माहिती मिळत असल्याने शिक्षिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या २०१० मधील पत्रानुसार, १० मार्च १९९३ पूर्वीच्या व नंतरच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे आदेश सर्व नगर परिषदांना देण्यात आले होते. त्याअनुषंगाने धाराशिव पालिकेच्या शिक्षण विभागाने रोजंदारी तत्त्वावर कार्यरत असलेल्या बालवाडी सेविका व शिक्षिकांची यादी मुख्याधिकाऱ्यांकडे सादर केली होती. मात्र, यावर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. १ नोव्हेंबर २०२२ रोजी नगर परिषद प्रशासनाने आयुक्त व संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय (वरळी, मुंबई) यांच्याकडे १४ बालवाडी शिक्षिकांना सामावून घेण्याचा प्रस्ताव पाठवला होता. मात्र, या प्रस्तावाचे पुढे काय झाले? याबाबत आस्थापना विभागात विचारणा केली असता, केवळ उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

२००५ च्या मंजूर आकृतीबंधानुसार बालवाडी शिक्षिका हे पद 'गट–क' श्रेणीत असतानाही त्याकडे दुर्लक्ष होतेय.

१. एकूण १४ बालवाडी शिक्षिकांच्या समावेशाचा प्रस्ताव मुंबई कार्यालयाकडे प्रलंबित. २. आकृतीबंधाचा पेच १८.०१.२००५ च्या आकृतीबंधात बालवाडी शिक्षिका पद ''गट–क'' श्रेणीत मंजूर. ३. विसंगती बालवाडी सेविकांच्या २८ जागा भरल्या गेल्या, मात्र शिक्षिकांच्या बाबतीत प्रशासन ''अस्थायी'' पदाचे कारण देत टाळाटाळ करत आहेत. ४. रोजंदारीवर कार्यरत असणाऱ्या शिक्षिकांना कायम करावे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## युद्धाच्या परिणामास तयार रहा

युद्ध लहान असो किंवा मोठे असो हे परवडणारे नसते. पुर्वीही युद्ध होत होती, ती दिर्घ काळ चालायाची! युद्धाचे नियम होते. सुर्य मावळला की, युद्ध थांबत व सुर्य उगविला की सुरू होत असते. यावेळी शंखनाद केला जात असत. आता युद्धाचे नियमच नाही. कधीही बॉम्ब फेकला जात आहे. पुर्वी शाळा व प्रार्थनास्थळे लक्ष्य करीत नसत. आता ते देखिल सोडले जात नाहीत. विध्वंसक हत्याराचा वापर करीत आहेत. हे योग्य नाही. युद्धात रासायनिक स्फोटकाचा वापर केला जात आहे. त्यामुळे दिर्घ काळ परिणाम हा जीवसृष्टीवर होतो. माणसाला जीव आहे बाकींच्याना नाही असे नाही. इतर प्राणी आहेत. पशुपक्षी आहेत. त्यांच्यावर मोठा परिणाम दिर्घ काळ होतो हे लक्षात घेतले पाहिजे. युद्ध नकोच तर समोचाराने समस्याची सोडवणुक झाली पाहिजे. विचाराने सोडवुणक झाली पाहिजे. युद्ध परवडणारे नाही. मोठी किंमत मोजावी लागते हे लक्षात घेतले पाहिजे. वास्तविक अमेरिका हा इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून इराणशी लढत आहे. युद्ध करीत आहेत. इराण व इस्त्राईल या दोन देशाचे मोठे नुकसान झाले आहे. मोठी हानी झाली आहे. अमेरिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. मोठी रॉकेट इराणने पाडली आहेत. अमेरिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. जागतिक आर्थिक नाडी ही तशी पाहिली तर इराणच्या हाती आहे. जगाला इंधन पुरविण्याची क्षमता इराणकडे आहे. गॅस व तेल पुरविण्याची क्षमता आहे. इराण देश श्रीमंत राष्ट्र आहे. त्याच्याकडे युरेनियमचा साठा असल्याचे सांगण्यात येते. पाणी नाही मात्र तेल आहे. इस्त्राईलची तीच स्थिती आहे. श्रीमंत राष्ट्र आहे. अल्पावधित मोठी प्रगती साधली आहे. एक सुंदर व चकाचक असणारी शहरे आहेत. अशी शहरे उद्धस्थ केली जात आहेत. इराण हा घाबरणारा देश नाही. मोठ्या हिंमतीने अमेरिकेशी एक महिण्यापासून लढत आहे. या युद्धाचा परिणाम जगातील राष्ट्रावर झालेला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावामुळे कच्चे तेलाचे जहाज आडकले आहेत. भारताकडे तेलाचा साठा तरी आहे पाकिस्तानकडे एक दिवसाचा देखिल तेलाचा साठा नाही. अनेक राष्ट्राकडे तेलाची कमतरता भासत आहे. भारताकडे अजून तेलाचा साठा व गॅस उपलब्ध आहे तरी आगामी काळात काय परिस्थिती होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे भारतीयांनी यापुढे इंधनाबाबत नियोजन केले पाहिजे. इराण हा देश इंधन पुरवित असला तरी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावाचा परिणाम भोगवा लागणार आहे. होर्मुझमधून जहाजांना परवानगी नाही तेथे अनेक जहाज आडकली आहेत. काही वेळा तर जहाज रोखण्यासाठी गोळीबार केला जात आहे. मुळात भारत हा कच्चे तेल रशियाकडून खरेदी करीत आला आहे. अमेरिकेचा दबाब होता की, रशियाकडून तेल खरेदी करू नये तरी भारताने फारसे लक्ष न देता रशियाकडून तेल खरेदी करून काही प्रमाणात स्टॉक केले आहे. त्यात भारतीय आता सावध वागतांना दिसून येत आहेत. कोणत्याही परिस्थितीत इंधनाचा गैरवापर करीत नाहीत. भारताला एकमेव स्वयंपाकाच्या गॅसची समस्या सतावणार आहे यामुळे पर्याय शोधला पाहिजे. विद्युत वीजेला पर्याय मोठ्या प्रमाणात सौरऊर्जा निर्मितीकडे भर दिला जात आहे. शेतीसाठी सुद्धा सौरऊर्जावर मोटारी चालाव्यात म्हणून सोय केली आहे. प्रत्येकाच्या घरावर सौरऊर्जाच्या प्लेटा दिसून येत आहेत. वास्तविक त्याही सक्तीने प्रत्येकाच्या घरावर बसविल्या पाहिजे. एक ना एक दिवस कोळसा संपणार आहे, त्याच प्रमाणे पाऊसमान कमी झाल्याने कोयनासारख्या ठिकाणीहून वीज निर्बंध येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणत्याही अधिक मागणीबाबत पर्याय शोधला पाहिजे. युद्ध तर दिर्घकाळ चालेल किंवा संपेल मात्र या काळात काय शिकलो याचा विचार केला पाहिजे. विनाकारण दुर्लक्ष केल्यास मोठी किंमत मोजावी लागते हे विसरून चालणार नाही. जागतिक शांततेची मोठी गरज आहे. जागतिक शांतता असावी असे म्हणत असले तरी अमेरिकेला मोठी खुमखुमी भरली आहे. जागतिक हक्कासाठी इराण सारखे राष्ट्र आपल्याच ताब्यात ठेवावे असे वाटते. पाकिस्तानला मदत करून आपल्या ताब्यात ठेवण्याचा अमेरिकेचा मनसुबा असू शकतो. त्याच प्रमाणे आज पर्यंत अमेरिकेने दुश्मन राष्ट्रावर हल्ला करण्यासाठी त्या राष्ट्राच्या शेजारील राष्ट्र आपल्याशी करून घेत आला आहे. युद्धभुमीसाठी शेजारी राष्ट्राचा उपयोग करून घेतला गेला आहे. अमेरिका कदापी आपली भुमी युद्धासाठी वापरली नाही हे पहिल्यांदा जगाने लक्षात घेतले पाहिजे. अमेरिका हा धुर्त आहे त्यात ट्रम्प हे तर कावेबाज आहेत. त्यामुळे कधीही कांही ही बोलणारे ट्रम्पवर विश्वास कदापी ठेवू नये. आज इराणासोबत खेटण्याची गरज नव्हती तरी इस्त्राईला पुढे करून इराणशी लढत आहे, युद्ध करीत आहे. या बाबीमुळे आता भारतीयांनी काय शिकले पाहिजे. कोणता धडा घेतला पाहिजे. स्वयंपुर्णता बरोबर स्वदेशीचा विचार सतत मनात ठेवून तो दृढ केला पाहिजे. अनेक राष्ट्र हे स्वयंपुर्ण बनले आहेत. स्वदेशीचा वापर करीत आहेत. भारत हा परशियवस्तूंकडे सहज आकर्षित होणारे राष्ट्र आहे. हा मोह सोडला तर आगामी काळात भारत हा महासत्ताधिश लवकर बनेल यात शंका नाही. भारतीयांनी या युद्धाचा अभ्यास करून स्वयंपुर्णता आवलंबली पाहिजे. कोणतेही संकट आल्यास त्यावर मुकाबला केला पाहिजे. आता भारतीयांनी सौरऊर्जेचा उपयोग करून घेवून संकटावर मात केली पाहिजे. सौरऊर्जा ही किफायशीर आहे. स्वयंपाक सुद्धा सौरऊर्जावर केलाच पाहिजे. तसे साहित्य त्याला युक्युपमेंट तयार केली पाहिजेत. जसे सौरऊर्जाद्वारे वीज निर्मिती केली जाते, गाड्या चालविल्या जातात तसे स्वयंपाक सुद्धा बनविता आला आहे. याबाबत संशोधन झाले पाहिजे. त्याशिवाय संकटावर मात करता येवू शकणार नाही. ईतर देशात सौरऊर्जा म्हणजे कमी उन्ह सुर्य असताना उपयोग करून घेतला जातो. भारताकडे तर मोठ्या प्रमाणात उन्हाची तिव्रता आहे. आगामी संकटावर मात करण्यासाठी सौरऊर्जेचा वापर करून घेणे ही काळाची गरज आहे. काही झाले तरी युद्धामुळे आलेल्या संकटावर मात करण्यासाठी सौरऊर्जाच हा एकमेव पर्याय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. स्वयंपुर्णता व स्वदेश बाबी अंगीकारल्या पाहिजेत.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली.



त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.

तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले.

तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.

तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात
# सीएस करियर मार्गदर्शन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित ,दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय,लातूर येथे दिनाक २९ एप्रिल २०२६ रोजी सीएस करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक सी एस गौरव वर्मा ,चेअरमन चाप्टर आय.सी.एस.आय. छत्रपती संभाजी नगर, सी.एस.कोमल मुथा सी. एस., संदीप भिंगारदिवे .आणि सी.एस. निखिल गुजलवार ,लातूर उपस्थित होते.सी . एस.कोमल मुथा यांनी विद्यार्थ्यांना कोर्स बद्दल सविस्तर माहिती दिली तसेच सी . एस.गौरव वर्मा यांनी देखील विद्यार्थ्यांना त्यांचे सी एस कोर्सविषयी असणारे शंका निराकरण केले. सी. एस.या संपूर्ण अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती दिली.या क्षेत्रातील विविध नोकरीच्या व व्यवसायाच्या संधी विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा.ऋतुजा देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकात सी. एस. अभ्यकमाचे महत्त्व सांगितले आणि महाविद्यालय विद्यार्थ्यासाठी राबवित असणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.सुभाष मोरे यांनी विद्यार्थ्यांना या अभ्यक्रमास प्रवेश घेण्यासाठी आवाहन केले.महाविद्यालयात कोचिंगची सुविधा उपलब्ध करून देणार आहोत हेही सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.नीता परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.जकोटिया राखी यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थितीत होते.

# तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी सेवानिवृत्त

तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयातील संगीत विभागात सन १९९१ ते १९९७ पर्यंत एकूण ०६ वर्ष आणि महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील संगीत विभागातील सन १९९७ ते २०२६ पर्यंत २९ वर्ष अशी एकूण ३५ वर्ष संगीत विभागात प्रदीर्घ सेवा केली.



आज गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी ते सेवानिवृत्त होत आहे त्यानिमित्त त्यांच्या कार्याबद्दल लिहिलेला हा लेख आहे.

ग्रामदैवत सिद्धेश्वरांच्या कर्मभूमीत तालमणी विश्वनाथ स्वामी सरांचा जन्म झाला. शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूर नगरात झाला. ते गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी यांचे वडिल गंगाधर व आई मैनाबाई यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांना एकूण चार भावंडे आणि एक बहीण आहे. चार भावंडापैकी तालमणी स्वामी सर हे चौथ्या क्रमांकाचे आहेत. लहानपणी वडिलांच्या व्यवसायास मदत करणे, वडिलांबरोबर कधीकधी पूजा पाठ करण्यासाठी ही जात असत. वडिल व्यापारी होते तसेच ते आयुर्वेदाचे चांगले जाणकार होते. त्यांनी दिलेल्या औषधामुळे बऱ्याच लोकांचे रोग बरे झाले आहेत.

तालमणी स्वामी सर यांचे कुटुंब शिवभक्त आहे. कुटुंबात आठवड्याचा सोमवार केला जातो. ही परंपरा त्यांना आई-वडिलांकडून मिळालेली आहे.

**तोहा शिव बरवा**
**तो हा शंभो बरवा**
**बहुत शुक्राताची जोडी**
**म्हणूनीया महादेव आवडी**
**असा हा शिवभक्त परिवार आहे.**

काम हेच शंभो, समाधान हेच शिव, मूलबाळ हेच शंकर, जीवन हेच महादेव.

विश्वाचे आराध्य दैवत शिवशंभो हे त्यांचे दैवत आहे. त्यांच्या शैक्षणिक जीवनात तालमणी बोरगावकर व सुरमणी बोरगावकर हे त्यांचे गुरु आहेत. या गुरूमुळेच त्यांच्या जगण्याला अर्थ प्राप्त झाला आहे.

तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी यांचे प्राथमिक शिक्षण लोकमान्य टिळक प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिर येथे झाले. त्यानंतरचे पुढील शिक्षण श्री देशीकेंद्र विद्यालयात झाले. महाविद्यालयीन शिक्षण महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पूर्ण झाले आहे. संगीत साधना गुरुवर्य तालमणी डॉ.राम बोरगावकर व सुरमणी पंडित बाबुराव बोरगावकर यांच्या सहवासात झाले आहे.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी सर राजर्षी शाहू महाविद्यालयात संगीत विषयाचे अध्यापनाचे कार्य करू लागले. त्यानंतर १९९७ पासून आजतागायत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले आहे. त्यांच्याबद्दल असे म्हणावेसे वाटते.

**आज दिन तो दिव्यत्वाचा समारोपाचा**
**शांतता प्रिय समजूतदार अशा मित्राचा**
**जो दिलखुलास मनमिळाऊ आनंदी रचनावादाचा**
**शांतता प्रिय नादब्रह्माचा....**
**ज्यांनी अनेक घडविले शिष्य**
**विचार आणि संस्काराचे केले भाष्य**
**म्हणूनच झाला गुणगौरव त्याचा**
**विविध पारितोषिक प्राप्त पारंगत विद्यार्थ्यांचा**
**ज्याचा श्वास असे संगीत**
**त्याचा ध्यास असे तबला**
**जो नाही भल्या भल्याला जमला**
**असा तबला स्वामी सरांनी वाजवला...**

तालमणी विश्वनाथ स्वामी सर यांची अखंड संगीत सेवा चालू आहे. त्यांना संगीत क्षेत्रात मान सन्मान प्राप्त झालेले आहेत. विविध ठिकाणच्या देवस्थानांकडून त्यांना विविध प्रकारचे पारितोषिके देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. गुरुदेव सिद्धपीठ, गणेशपुरी जि. ठाणे येथे संगीत सेवा झाली असून त्याठिकाणी त्यांचा यथोचित सन्मान सुद्धा करण्यात आला आहे. सिद्धयोग ध्यान केंद्र, लातूर येथे साप्ताहिक सत्संगाच्या माध्यमातून कायमसेवा सुरू आहे याचे सर्व श्रेय स्व. सरोजिनीताई सांबप्पा गिरवलकर यांना ते देतात. बीड जिल्ह्यातील कपिलधारा या देवस्थानच्यावतीने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्याठिकाणी अखंडपणे संगीत सेवा चालू आहे. दत्त संस्थान रुईभर जि. धाराशिव याही ठिकाणी संगीत सेवा दिली जाते. त्याबरोबरच लातूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर रत्नेश्वर यात्रेच्या निमित्ताने संगीत सेवा चालू आहे. गोलाईतील जगदंबा मंदिर, गांधी चौकातील महालक्ष्मी मंदिर, औसा रोड वरील दत्त मंदिर या ठिकाणी अखंडपणे सेवा देण्याचे कार्य चालू आहे. त्याबरोबरच लातूरचे दैवत श्री शिवयोगी झिंगणप्पा सिदमल अप्पा स्वामी यांच्या वार्षिक सप्ताहात अखंडपणे सेवा चालू आहे. पाचशे घर मठ, मनमथ स्वामी सप्ताहात, ज्ञान सरस्वती मंदिर संस्थानात, नवरात्र महोत्सवात अखंडपणे संगीत सेवा चालू आहे. श्री वैद्यनाथ मंदिर याही ठिकाणी सेवा चालू आहे.

**निमित्त मापसी बसलो आहे**
**तो मी नोव्हे स्वामी सता ।**

मी जे कोणतेही कार्य करत आहे ते प्रत्यक्ष शंभो माझ्याकडून करून घेत आहे, असा त्यांचा दृढ विश्वास आहे. निसर्गात विविध वृक्ष, वेली आहेत. त्यातही आंबा व नारळाच्या वृक्षांना महत्त्व आहे. नारळाचे झाड खूप उंच जाते. तालमणी विश्वनाथ स्वामी सरांचे नारळाच्या झाडाप्रमाणे नावलौकिक प्राप्त झाले आहे. अध्यापन क्षेत्रात खूप उंच व कीर्तिमान झाले आहेत. आंब्याच्या झाडाप्रमाणे गोड फळे व सावली देण्याचे काम अध्यापनातून त्यांनी केले आहे.

विश्वनाथ स्वामी सरांचे विद्यार्थी देशाच्या व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले आहेत. पोलीस, शिपाई, शिक्षक, तलाठी, व्यापारी, संगीत शिक्षक, राजकारणी, शेतकरी, कलावंत म्हणून जीवन जगत आहेत.

तालमणी विश्वनाथ स्वामी सर सरळ स्वभावाचे, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे व्यक्तिमत्व आहे. आपण जे कार्य करतो ते सत्कार्य होणार आहे, असा त्यांचा गाढ विश्वास आहे. सरांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. त्यांना विविध संस्थांच्या वतीने मान सन्मान प्राप्त झालेले आहेत. महाविद्यालया तर्फे संगीताचे चांगले शिक्षक म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

तालमणी स्वामी सर स्पष्ट वक्तेपणा हा विशेष गुण आहे. त्याबरोबरच दानशूर वृत्ती त्यांच्यात आहे.

हा वारसा त्यांना आई-वडिलांकडूनच मिळालेला आहे. महाविद्यालयातील गोर-गरीब विद्यार्थ्यांना

>> पान ५

पान २ वरून...

## तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी सेवानिवृत्त

आर्थिक मदत करणे, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्याचे कार्य त्यांनी केले. अनेक वर्षापासून कला शाखेचे समन्वयक म्हणून ते काम करीत आहेत. कोणत्याही पदाची आस त्यांनी बाळगली नाही. महाविद्यालयाने सोपविलेली जबाबदारी अत्यंत कार्यक्षमतेने त्यांनी पूर्ण केलेली आहे. गेली ३५ वर्ष महाविद्यालयाशी व विद्यार्थ्यांशी ते एकरूप झालेले आहेत. प्रत्येक प्राचार्याबरोबर नम्रतेने त्यांचे वर्तन आहे. युवक महोत्सवाच्या माध्यमातून भरीव कामगिरी त्यांच्याकडून झालेली आहे. युवक महोत्सवात महाविद्यालयास विविध पारितोषिके, त्याबरोबरच विविध स्पर्धेच्या माध्यमातून वैयक्तिक गायन, समूह गायन, विद्यापीठ स्तरावरील महाविद्यालयास समूह गायन स्पर्धेत दोन वेळेस पारितोषिक प्राप्त झाले आहे. युवक महोत्सवात चॅम्पियनशिप मिळवून देण्यात स्वामी सरांचा सिंहाचा वाटा आहे. प्रा. विजयकुमार धायगुडे सर आणि तालमणी स्वामी सरांच्या माध्यमातून युवक महोत्सवात विविध पारितोषिक प्राप्त झालेले आहेत. महाविद्यालयातील स्नेहसंमेलन असो किंवा स्वागत गीतासाठी स्वामी सर व विजयकुमार धायगुडे सरांनी महाविद्यालयाचे नावलौकिक वाढविण्याचे कार्य केले आहे.

तालमणी विश्वनाथ स्वामी सरांचा परिवार अत्यंत सुशिक्षित व सुसंस्कृत आहे. त्यांची पत्नी सौ. रेखा विश्वनाथ स्वामी या उच्चशिक्षित आहेत. त्यांचे एम.लिब. पर्यंतचे शिक्षण झालेले असून विद्यापीठातून तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांना दोन कन्या आहेत. पहिली कन्या वैष्णवी एम.टेक. चे शिक्षण पूर्ण केले आहे. तिचा नुकताच विवाह झालेला असून ती पुणे येथे वास्तव्यास आहे. दुसरी कन्या डॉ. शांभवी सध्या मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालयात शिक्षण चालू आहे. असा त्यांचा उत्तम व कार्यक्षम परिवार आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील कार्य गेली ३५ वर्षे अत्यंत यशस्वी रीतीने वाटचाल करीत तालमणी विश्वनाथ स्वामी सर आपल्या वयाची ५८ वर्ष पूर्ण करून ३० एप्रिल २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. असा ज्ञानरूपी, तपस्वी, विद्यार्थी प्रिय मित्र सेवानिवृत्त होत आहे. याची उणीव महाविद्यालयाला जाणवल्याशिवाय राहणार नाही.

तालमणी प्रा. विश्वनाथ स्वामी सर यांना उदंड आयुष्य लाभो, निरोगी जीवन मिळो, त्यांचे राहिलेले कार्य व स्वप्न पूर्ण होवो. निवृत्तीनंतरचे हे खऱ्या अर्थाने अनुभवी, समृद्ध, प्रगल्भ आयुष्य आहे. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा कधीही न संपणाऱ्या आपुलकी स्नेहाचा ऋणानुबंध आमच्या सोबत असेल. पुढील आयुष्यासाठी आपणास व आपल्या परिवाराला अनंत कोटी कोटी शुभेच्छा. येणारा काळ आपल्यासाठी आनंददायी, प्रेरणादायी, निरोगी, भरभराटीचे, सुख-समृद्धीचे जावो.



जय शंभो चरणी प्रार्थना.

**- प्रा. टी. एम. बिचकाटे**
**सेवानिवृत्त शिक्षक**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग १ मे रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शुक्रवार, ०१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने बंद राहील. तसेच शनिवार, २ मे २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

## लातूर जिल्ह्यातील नीट परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत आयोजित नीट युजी परीक्षा येत्या ३ मे, २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत लातूर जिल्ह्यातील लातूर आणि निलंगा तालुक्यातील एकूण ३४ उपकेंद्रांवर पार पडणार असून, या परीक्षा कालावधीत केंद्रांच्या परिसरात होणारी संभाव्य गर्दी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेवून जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थींशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रित जमण्यास, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास किंवा शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली असून, परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक ही माध्यमे ३ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल किंवा इतर कोणत्याही प्रसार माध्यमांसह प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला असून, कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही, जेणेकरून परीक्षा अत्यंत शांततेत आणि सुरळीत वातावरणात पार पडेल. हा आदेश परीक्षा केंद्रावर कर्तव्यावर असलेले अधिकारी, कर्मचारी, निगराणी करणारे पथक आणि पोलीस अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयीन कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाही, मात्र इतर सर्व नागरिकांनी या प्रतिबंधात्मक आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### लातूर महानगरपालीकेचा कारभार पारदर्शक आणि लोकाभिमुख राहील यांची दक्षता घ्या

# निधीचा विनीयोग आणि योजनांची काटेकोर अमंलबजावणी करा - माजी मंत्री, आ. देशमुख





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालीकेत सर्व योजनांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि निधीचा विनियोग योग्य पद्धतीने होईल याची दक्षता घ्यावी. योजनांची कामे ठरलेल्या वेळापत्रकानुसार दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत. या संदर्भातील एकूण कारभार पारदर्शक आणि लोकाभिमुख राहील, हे पाहावे अशा स्पष्ट सूचना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवारी महानगरपालीकेत घेतलेल्या आढावा बैठकीत दिल्या आहेत.

बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्यासह लातूर महानगरपालिकेत जाऊन महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, माजी महापौर दिपक सुळ, काँग्रेस पक्षाचे गटनेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, परीवहन समिती सभापती फैसलखान कायमखानी, मनपा आयुक्त मानसी मीना, अतिरिक्त आयुक्त देवीदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाब खानसुळे व इतर सर्व विभाग प्रमुख तसेच काही नगरसेवकांच्या उपस्थितीत शहरात सध्या राबविण्यात येत असलेल्या विविध विकास योजना, प्रस्तावित योजना आणि नियमित कामकाजाबाबत विस्तृत आढावा घेतला.

वाहतूक आणि पार्किंग व्यवस्था:

सध्या उन्हाळी सुट्ट्या आणि लग्न समारंभांचे दिवस असल्याने शहरात वाहतूक कोंडीच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात येत आहेत. यावर तातडीने कार्यवाही करून शहरातील वाहतुकीला शिस्त लावावी. सिग्नल आणि सीसीटीव्ही यंत्रणा अद्ययावत करावी. हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रभावीपणे अतिक्रमणविरोधी मोहीम राबवावी. शैक्षणिक संस्था, मंगल कार्यालये, रुग्णालये, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच रहिवासी संकुलांत पार्किंग व्यवस्था अनिवार्य करावी. शासनमान्य सल्लागाराची नियुक्ती करून भविष्यातील नियोजन करावे आणि प्रदूषणाचा स्तर कमी राहील यासाठी प्रयत्न करावेत अशी सुचना आमदार अमित देशमुख यांनी दिली आहे.

**कचरा व्यवस्थापन**

शहरातील कचरा व्यवस्थापनात सुधारणा झाली असली तरी त्यात आणखी दुरुस्त्या कराव्यात. कचऱ्यावर प्रक्रिया अधिक प्रभावी करून ढीग लागणार नाहीत याची काळजी घ्यावी. या एकूण कामकाजात महिलांचा सहभाग वाढवावा असे आमदार अमित देशमुख म्हणाले.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक**

लातूर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य-दिव्य पुतळा उभारणीचे काम सुरू झाले आहे. मात्र, या कामाचा दर्जा आणि पारदर्शकतेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे या प्रकल्पाचे पुनरावलोकन करावे. हैदराबादच्या धरतीवर हे काम व्हावे, अशी लोकभावना असल्याने तेथे अभ्यास गट पाठवून सूचना घ्याव्यात. संपूर्ण डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कचा सर्वंकष विकास आराखडा तयार करून स्मारकाची उभारणी करावी असे त्यांनी सांगीतले.

**नियमित पाणीपुरवठा**

शहरात नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे. पिवळे किंवा दूषित पाणी वितरित होणार नाही याची काळजी घ्यावी. ठिकठिकाणी होणारी गळती थांबवावी. हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रातून बाहेर सोडण्यात येणाऱ्या अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करावा असे निर्देश मनपा प्रशासनाला दिले.

**पथदिवे आणि सौर ऊर्जा**

शहरातील पथदिव्यांची देखभाल नियमित व्हावी. घर तिथे पथदिवा अशी योजना तयार करून विस्तार करावा. मंजूर सोलर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून वीज वापराच्या बाबतीत महापालिका स्वयंपूर्ण करावी.

**प्रशासकीय सुलभता**

नागरिकांना बांधकाम परवाना मिळण्यात होणारी दिरंगाई टाळावी. या प्रक्रियेत नागरिकांना मनस्ताप होणार नाही याची काळजी घ्यावी आणि दिलेल्या परवान्याप्रमाणेच बांधकामे होतील याची दक्षता घ्यावी. शहरातील प्रलंबित कबाले वाटपाचा आढावा घेऊन, नियमानुसार असलेले कबाले वाटप ताबडतोब करावेत, यासाठी शासनाच्या नवीन धोरणाचा आधार घ्यावा असे यावेळी सांगीतले.

**युनीपोल बाबत कायदेशीर कार्यवाही**

लातूर शहरात मागच्या काळात उभारण्यात आलेल्या युनिपोल संदर्भात कायदेशीर प्रक्रिया तपासून घ्यावी, हे युनिपोल नियमानुसार नसतील तर ते काढून टाकावेत. आगामी काळात जाहिरात फलक परवानगी देताना नियमाचे उल्लंघन होणार नाही, शहराचे सौंदर्य बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी असे आमदार देशमुख यांनी सांगीतले.

नागरिकांना जन्म मृत्यू प्रमाणपत्र वेळेत मिळण्यासाठी कामकाजात सुधारणा करावी, शहरात फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, गंजगोलाई तसेच शहरातील इतर ऐतिहासिक सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी असे सांगीतले.

**नवीन तंत्रज्ञानाचा वापर**

एकूणच प्रशासकीय कामकाज पारदर्शक, सुलभ आणि गतिमान होण्यासाठी एआय व इतर अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करावा, यासह अनेक महत्त्वाच्या सूचना याप्रसंगी केल्या असून अधिकारी, कर्मचारी यांचेही म्हणणे ऐकून घेऊन, त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यात येइल व आवश्यक त्या ठिकाणी निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपूरावा करण्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

या प्रसंगी नगरसेवक फारुक शेख, विकास कांबळे, युनुस मोमीन, इसरार सगरे, डॉ. बालाजी सांळुके, अतिश चिकटे, मुक्तार शेख, अमोल लांडगे, व्यंकटेश पुरी यांच्यासह मनपाचे विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## एसटी महामंडळाच्या लातूर विभागात प्रवासी राजा, कामगार पालक दिन उपक्रमाचे वेळापत्रक जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण करण्यासाठी एसटी महामंडळाने प्रत्येक आगारात प्रवासी राजा दिन आणि कामगार पालक दिन आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून, लातूर विभागातील आगारांसाठी या उपक्रमाचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

लातूर विभागातील या दौऱ्याची सुरुवात २९ एप्रिल २०२६ रोजी उदगीर आगारातून होणार असून त्यानंतर ६ मे रोजी लातूर, १३ मे रोजी औसा, २० मे रोजी अहमदपूर आणि ३ जून २०२६ रोजी निलंगा आगार येथे या उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. या वेळापत्रकानुसार प्रत्येक आगारात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्रवासी राजा दिन आयोजित केला जाईल, ज्यामध्ये प्रवासी, विविध प्रवासी संघटना, शाळा व महाविद्यालयांचे प्रतिनिधी आपल्या बस सेवेसंबंधीच्या तक्रारी आणि सूचना लेखी स्वरूपात मांडू शकतील. त्यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार असून, या सत्रात एसटी कर्मचारी आणि संघटनांचे वैयक्तिक प्रश्न, जसे की रजा मंजुरी, वेळापत्रक आणि प्रशासकीय कारवाई यांवरील तक्रारींचे तात्काळ निराकरण केले जाणार आहे.

## शोध घ्या, संशोधक व्हाल: -डॉ. विवेक सौताडेकर



**लातूर/प्रतिनिधी** :ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात आपला महाराष्ट्र समजून घेऊया या तीन दिवसीय उपक्रमाचे उद्घाटन इतिहास संशोधक, लेखक, व्याख्याते, प्रख्यात निवेदक, डॉ. विवेक सौताडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

येणाऱ्या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात २९ , ३० एप्रिल आणि १ मे या तीन दिवसीय प्रदर्शनात इयत्ता ५वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी आपला महाराष्ट्र समजून घेण्यासाठी अनेक विषयांची मांडणी केली आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. सौताडेकर म्हणाले आपण ज्या भूमीत राहतो त्याचा इतिहास ,भूगोल, सांस्कृतिक, सामाजिक ,राजकीय, साहित्यिक वारसा समजून घेणे आपले आद्य कर्तव्यच आहे, आणि ते ज्ञानप्रकाशची मुलं या प्रदर्शनातून करत आहेत हे पाहून कौतुक वाटले. महाराष्ट्राची दिव्य परंपरा व संस्कृतीचे दर्शन यातून होत आहे. आपल्या लातूरलाही पन्नास हजार वर्षांचा इतिहास लाभला आहे. तुम्ही शोध घेतला तर संशोधक वृत्ती वाढते आणि यातूनच संशोधक घडतील. ते नक्कीच ज्ञानप्रकाश मध्ये घडतील असा विश्वास मला वाटतो. डॉ. सौताडेकर यांच्या प्रभावी वक्तृत्वाने विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले त्यावेळी विविध गीतांची सलामी विद्यार्थ्यांनी त्यांना दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी हिंदी विषयात मिळवलेल्या डॉक्टरेट पदवी बद्दल प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी डॉ सौताडेकर यांचा सत्कारही केला.

तीन दिवसीय प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपले सण -उत्सव, संत परंपरा, पर्यटनस्थळे, गडकिल्ले, धरणे साहित्य, प्रादेशिक विभाग, समाजसुधारक, ऐतिहासिक वास्तू, क्रांतिकारक, शिल्पे, विद्यापीठ, विधानभवन इत्यादी विषयांची अभ्यासपूर्वक मांडणी केली आहे.

स्वतः निवडलेल्या विषयाची मांडणी करण्यासाठी शोध घेऊन अधिक खोलात जाऊन आपला महाराष्ट्र समजून घ्यावा या उद्देशाने या प्रदर्शनाची संकल्पना आकारास आली आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी अनेक प्रतिकृती बनवल्या आहेत. याची तयारी करण्यासाठी अगदी कमी कालावधी मिळाला असला तरी मुलांची तयारी पाहून मुख्याध्यापिका सविता नरहरे यांनी मुलांचे कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे,शालेय समिती सदस्य प्रभाकर हिप्परगे यांची उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपदा पांडे यांनी केले. या उपक्रमाची पार्श्वभूमी प्रशांत शिंदे यांनी मांडली. मुलांना हा अनुभव देण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## ग्रामपंचायत गंगापुर पोटनिवडणूक सरपंच पदाच्या निवडणुकीत बाबु खंदाडे यांचे वर्चस्व

### सरपंचपदी भाजपच्या ऊषा गायकवाड विजयी

**लातूर/प्रतिनिधी :**ग्रामपंचायत गंगापूर ची सरपंच पदासाठी पोटनिवडणूक होती, त्यामध्ये भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबु हणमंतराव खंदाडे यांच्या उमेदवार उषाबाई प्रल्हाद गायकवाड या निवडून आल्या, या ग्रामपंचायत वर कॉग्रेस पक्षाचे वर्चस्व होते, दिवंगत विलासराव जी देशमुख व आमदार अमित देशमुख यांचे नाव घेऊन काग्रेस पक्षाने हि निवडणूक लढवली त्यांना भारतीय जनता पक्षाचे कामगार मोर्चा चे जिल्हा अध्यक्ष ज्योतीराम चिवडे पाटील यांनी काग्रेस पक्षाला मदत केली तरी ही बाबु हणमंतराव खंदाडे यांच्या उमेदवार गायकवाड उषाबाई प्रल्हाद या ११३ मंतानी निवडून आल्या. काग्रेस प्रणीत उमेदवारास १५६७ व निष्ठावंत भाजप नेते बाबु खंदाडे यांच्या उमेदवारास १६८० मतदान झाले, यात तीन वर्षानंतर पुन्हा एकदा भाजपचे वर्चस्व गंगापूर ग्रामपंचायत वर आले.

बाबु खंदाडे सरपंच असताना गंगापूर ग्रामपंचायत ने आदर्श ग्रामपंचायत म्हणून पुरस्कार जिंकला होता, राष्ट्रीय पातळीवर मान सन्मान मिळवला होता तरी नंतर गंगापूर ग्रामपंचायत ही कांग्रेस पक्षाच्या ताब्यात गेली होती, अंतर्गत गटबाजी व भ्रष्टाचार याला कंटाळून पुन्हा एकदा गंगापूर च्या नागरिकांना



बाबुराव खंदाडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून निवडून दिले.

गंगापूर ग्रामपंचायत निवडणुकीत कांग्रेस व भाजप एकत्र येऊन ही निष्ठावंत भाजप च्या उमेदवार ला हरवु शकले नाहीत. काग्रेस प्रणीत उमेदवाराचा प्रचार माजी जिल्हा परिषद सदस्य सतिस कानडे, लातुर पंचायत समिती चे माजी सभापती तानाजी फुटाणे, माजी सरपंच किरण शिंदे व भाजप किसान मोर्चा चे जिल्हा अध्यक्ष ज्योतीराम चिवडे यांच्या उमेदवार व माजी सरपंच सरिता बनसोडे यांचा पराभव झाला.



या निवडणुकीत बाबु खंदाडे यांच्या नेतृत्वाखाली सतिश धोत्रे पाटील, प्रताप शिंदे, इसुब पठाण, बाबुलाल शेख, जिलानी शेख, माजीद शेख, विशाल गोरे, विशाल गायकवाड, सोनेराव गायकवाड, प्रेम गायकवाड, सौदागर गायकवाड, किसन तळेकर, गोविंद कुकडे, सुयोग जोगदंड, दिपक कदम, अरुन मिंड, साजीद शेख, सागर कुराडकर, अविनाश गायकवाड, जगन्नाथ चिवडे, सुर्यभान मस्के, रुषी राऊत, प्रभाकर भाग्यवंत, खंडु वाघमारे, विनोद दंडीमे, कुमार दंडीमे, सांचित दंडीमे आदी नी सहकार्य केले.

## उकाड्यापासून बचाव:उन्हाच्या तडाख्याने नदी, विहीर अन् तलावात पोहण्यासाठी बच्चे कंपनीची गर्दी

**लातूर/प्रतिनिधी :** सध्या पारा ४० अंशांच्या वर गेला आहे. उन्हामुळे अंगाची काहिली होत असताना थंडावा मिळावा म्हणून बच्चे कंपनीसह सर्वच जण नदी, विहीर, तलावात पोहायला जात आहेत. शाळांना सुटी लागल्यामुळे बच्चे कंपनी दुपारी पोहायला जात आहे. या सुटीत पोहायला शिकण्यासह मनसोक्त पोहण्याचा आनंद लुटत आहेत. काही जण सकाळी अकरा वाजेच्या सुमारास नदीवर जातात. ते दुपारी चारनंतर परततात. स्वामींग पुल गर्दीने फुलले आहेत.

उन्हापासून संरक्षण मिळावे म्हणून नदीत मनसोक्त डुंबतात. पोहायला शिकणाऱ्या लहान मुलांना पालकांनी सोबत न्यावे. सुरक्षा साधणे घेऊनच त्यांना पाण्यात उतरवले पाहिजे. पाठीवर ड्रम बांधणे, भोपळा बांधणे किंवा ट्यूब बांधून पोहायला शिकवले पाहिजे. विहिरीचा



तळ खोल असल्याने मुलांना भीती वाटते अशा वेळी पालकांनी काळजी घेतली पाहिजे.

पोहायला जाताना प्लास्टिक डब्बा, रबरी ट्यूब सोबत न्यावे जलतरण तलावात प्रशिक्षक उपलब्ध आहेत. पोहायला शिकणाऱ्यांची या ठिकाणी सुरक्षा रक्षकांकडून काळजी घेतली जाते. पोहताना काही धोका होऊ नये, यासाठी नवशिक्या मुलांच्या पाठीवर फायबरचे ड्रम बांधले जातात. तलावावर पोहणारी मंडळी रबरी ट्यूब, पॅकबंद पत्र्याचे डबे वापरतात.